# प्रेसनोट

दि. १७/०४/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | नेवासा पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३९७/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) तुकाराम भिमराव खेडकर, वय ३५ वर्षे, पोलीस नाईक, ब.नं.२१२७, वर्ग–३, नेमणुक नेवासा पोलीस स्टेशन, ता.नेवासा, जि.अहमदनगर<br>२) नंदू पांडूरंग सरोदे (खाजगी इसम), रा.देवसडे, ता.नेवासा, जि.अहमदनगर<br>३) खाजगी इसम पोपट सरोदे (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ८,०००/– रुपये तडजोडीअंती ५,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्याविरूध्द नेवासा पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या भा.दं.वि.क.३२४ वगैरे गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी नंदू सरोदे, खाजगी इसम व आरोपी लोकसेवक तुकाराम भिमराव खेडकर, पोलीस नाईक, ब.नं.२१२७, नेमणुक नेवासा पो.स्टे. हे तक्रारदार यांच्याकडे १०,०००/– रूपये लाच मागणी करत असलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयाकडे दि.१२/०४/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.१२/०४/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान खाजगी इसम नंदू सरोदे यांनी तक्रारदार यांच्याकडे आरोपी लोकसेवक खेडकर यांचेकरीता १०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तसेच खाजगी इसम पोपट सरोदे यांनी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक खेडकर यांच्याकडे नंदू सरोदे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिले. त्यानंतर दि.१६/०४/२०२४ रोजी आरोपी लोकसेवक खेडकर यांचेविरुध्द लाच मागणी पडताळणी केली असता त्या दरम्यान आरोपी लोकसेवक खेडकर यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचेविरुध्द दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १००००/– रुपये लाचेची मागणी तडजोडअंती ८०००/– रुपये लाचेची मागणी करुन ५०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि.१६/४/२०२४ रोजी आरोपी लोकसेवक खेडकर यांचेविरुध्द सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. त्यादरम्यान आरोपी लोकसेवक तुकाराम भिमराव खेडकर, पोलीस नाईक, ब.नं.२१२७, नेमणुक नेवासा पो.स्टे. यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून ५०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारली. त्यावेळी त्यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक तुकाराम भिमराव खेडकर, खाजगी इसम नंदू सरोदे व खाजगी इसम पोपट सरोदे यांचेविरुध्द नेवासा पोलीस स्टेशन गुरनं.३९७/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर